संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
अंतर्गत

# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष शिबिर

**दत्तक ग्राम पिंपळखुटा (अर्मळ)**

जि.अमरावती (2018-19)

**दि. १४ जानेवारी २०१९ ते २० जानेवारी २०१९**

## निबंधात्मक अहवाल

**(फोटोसह)**


कार्यक्रम अधिकारी
**प्रा. डॉ. डी. एस. नामुर्ते**

प्राचार्य
**डॉ. स्मिता देशमुख**

# SantGadgeBabaAmravatiUniversity,Amravati
## Shri Shivaji Art & Commerce College, Amravati
### N.S.S. Camp At Pimpalkhuta STUDENT LIST 2018-2019

| Sr. No. | Volunteers Names | Class | Category |
|---|---|---|---|
| 1 | Ku. Aaditi Shrikant Dongare | B.A.I | SC |
| 2 | Ku.Achal Umeshrao Ingle | B.COM.II | SC |
| 3 | Ku. Anuja Vinodrao Kadu | B.COM.I | OBC |
| 4 | Ku. Ashvini Dilip Tekam | B.A.I | ST |
| 5 | Ku. Chanchal Narayan Daroksr | B.COM.II | OBC |
| 6 | Ku.Chaitali Rameshwar Deshmukh | B.A.I | SBC |
| 7 | Ku.DaminiBhashkarrao Gawande | B.A.II | OBC |
| 8 | Ku. Gayatri Ramesh Ingole | B.A.II | OBC |
| 9 | Ku. Kajal Ashok Hive | B.COM.II | NT-C |
| 10 | Ku. Mayuri Dipak Tidke | B.A.II | SC |
| 11 | Ku. Poonam Jivak Wakde | B.A.I | SC |
| 12 | Ku. Pooja Nirgun Borkar | B.A.I | SC |
| 13 | Ku. Pooja Diliprao Mankariya | B.A.II | OPEN |
| 14 | Ku. Pooja Subhashrao Dhote | B.A.I | OBC |
| 15 | Ku. Pooja Ruprao Tathe | B.COM.II | OBC |
| 16 | Ku. PragatiNandakishor Gudadhe | B.A.II | OBC |
| 17 | Ku. Pratiksha Dipak Nitanvare | B.A.II | SC |
| 18 | Ku. Priyanka Ramesh Uike | B.COM.I | ST |
| 19 | Ku. Rajeshri Rajendra Dayalkar | B.A.II | OBC |
| 20 | Ku. Reshma Shantaram Adbol | B.COM.II | NT-B |
| 21 | Ku. Reshma Anil Bansod | B.A.II | SC |
| 22 | Ku. Rekha Marotrao Patake | B.A.I | SC |
| 23 | Ku. Samiksha Rajendra Hood | B.A.I | OBC |
| 24 | Ku. Samiksha Dhananjay Pawar | B.A.I | OBC |
| 25 | Ku. Samiksha Narendra Nirmal | B.A.I | OBC |
| 26 | Ku. Sujata Ashok Gajbhiye | B.A.I | SC |
| 27 | Ku. Shrushti Hitendra Patil | B.A.I | SC |
| 28 | Ku, Sneha Anil Kawale | B.A.I | SC |
| 29 | Ku. Shivani Diliprao Gambhir | B.A.I | SC |

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | Ku. Shivani Naresh Kokate | B.COM.I | OBC |
| 31 | Ku. Shweta Ramdas Barde | B.COM.I | OBC |
| 32 | Ku. Shubhangi Kishorrao Narwade | B.COM.II | OBC |
| 33 | Ku. Tejaswini Sunil Gonge | B.COM.II | OBC |
| 34 | Ku. Tejaswini Vilas Kuralkar | B.COM.I | NT-B |
| 35 | Ku. Vaishnavi Anil Konde | B.A.I | OBC |
| 36 | Ku. Vaishnavi Ravindra Lokhande | B.A.I | SBC |
| 37 | Ku. Vaishnavi Sanjay Padar | B.A.I | OBC |
| 38 | Ku. Vaishnavi Sanjayrao Wankhade | B.COM.I | SC |
| 39 | Aadesh Dnhaneshwar Revskar | B.COM.I | OBC |
| 40 | Aniket Nileshrao Kalaskar | B.COM.I | OBC |
| 41 | Aniket Bhagwan Wange | B.A.II | OBC |
| 42 | Aman Narayan Parode | B.A.I | OBC |
| 43 | Atul Duryodhan Sonule | B.A.I | SC |
| 44 | Abhijit Shrikrushn Dhamankar | B.A.I | OBC |
| 45 | Abhijit Rajendra Kawane | B.A.III | NT-C |
| 46 | Ajay Raju Chavan | B.A.I | ST |
| 47 | Adesh Shravan Kale | B.A.I | OBC |
| 48 | Akshay Harish Borule | B.A.I | OBC |
| 49 | Akash Babanrao Wankhde | B.A.II | SC |
| 50 | Akash Dattatray Mehatre | B.AIII | OBC |
| 51 | Akash Manikrao Waghamare | B.COM.II | ST |
| 52 | Akash Panditrao Khadse | B.A.II | SC |
| 53 | Aakash Sanjay Chavan | B.A.II | VJNT |
| 54 | Aakash Gautam Khandare | B.A.II | SC |
| 55 | Anup Balasaheb Chandane | B.A.II | SC |
| 56 | Amol Wasudeorao Junankar | B.COM.II | OBC |
| 57 | Amit Gopalrao Khairkar | B.COM.II | NT-C |
| 58 | Avinash Bansi Jamkar | B.COM.II | ST |
| 59 | Banti Mahadeo Holgare | B.A.I | ST |
| 60 | Bhushan Ramesh Parteki | B.A.III | ST |
| 61 | Chetan Sahebrao Jadhao | B.A.I | VJNT |
| 62 | Darshan Ajendra Wathodkar | B.COM.I | OBC |
| 63 | Deep Vinod Rangire | B.A.I | OBC |

| | | | |
|---|---|---|---|
| 64 | Govardhan Khushal Ade | B.COM.I | VJNT |
| 65 | Gaurav Gopal Awaghad | B.COM.I | NT-C |
| 66 | Gaurav Swarupchand Khiwsara | B.COM.I | OPEN |
| 67 | Gopal Nandu Doifode | B.A.III | SC |
| 68 | Harshal Shankar Chavhan | B.A.II | VJNT |
| 69 | Hrushikesh Dipakrao Nimkar | B.A.I | OBC |
| 70 | Kaseem Kayyum Shekh | B.A.I | OPEN |
| 71 | Mayur Narayan Bhojane | B.COM.II | OBC |
| 72 | Mayur Dipakarao Wankhade | B.COM.I | OBC |
| 73 | Mahesh Vilas Mahala | B.COM.I | OBC |
| 74 | Parag Sunilrao Raut | B.A.I | OBC |
| 75 | Prem Manoharrao Wankhade | B.A.I | SC |
| 76 | Pratik Shivchand Jadhao | B.COM.I | VJNT |
| 77 | Prajval Deepakrao Deshmukh | B.A.II | OBC |
| 78 | Pranay Gajanan Dhrmale | B.A.I | OBC |
| 79 | Pankaj Manik Kathmode | B.COM.II | ST |
| 80 | Rajat Kishor Bijawe | B.A.I | OBC |
| 81 | Rushikesh Bhaskarrao Chavhan | B.A.I | ST |
| 82 | Ritesh Banshi Nagdevate | B.A.I | SC |
| 83 | Sachin Anil Solanke | B.A.I | ST |
| 84 | Suraj Kisan Kathmode | B.A.I | ST |
| 85 | Shashank Madan Bhagat | B.A.I | SC |
| 86 | Suresh Ratnakar Shelke | B.A.I | ST |
| 87 | Saurabh Jagadish Dawange | B.COM.I | NT-C |
| 88 | Suraj Subhash Rupanarayan | B.COM.I | SC |
| 89 | Shubham Arun Gharade | B.A.II | SC |
| 90 | Suryachandra Bharat Devkar | B.A.II | ST |
| 91 | Shubham Dhyndev Kavalkar | B.COM.I | OBC |
| 92 | Shubham Banshilal Gupta | B.A.III | ST |
| 93 | Shubham Rajendra Solanke | B. | ST |
| 94 | Sachin Rajendrrao Chandurkar | B.COM.II | OBC |
| 95 | Sumedh Ravindra Nannaware | B.A.II | SC |
| 96 | Tejas Gajanan Kamble | B.A.I | SC |
| 97 | Vicky Prakash Wankhade | B.A.I | OBC |

| | | | |
|---|---|---|---|
| 98 | Vishal Santosh Londhe | B.A.I | SC |
| 99 | Vikas Vikram Shelke | B.A.I | ST |
| 100 | Vijay Raju Chavan | B.COM.II | ST |

| Group | OPEN | OBC | SC | VJ-NT | ST | SBC | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Male | 02 | 22 | 14 | 09 | 15 | 00 | 62 |
| Female | 01 | 17 | 13 | 03 | 02 | 02 | 38 |
| Total | 03 | 39 | 27 | 12 | 17 | 02 | 100 |

NSS P.O.
राष्ट्रीय सेवा योजना
कार्यक्रम अधिकारी
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय
अमरावती

PRINCIPAL
Principal
Shri Shivaji Arts and Commerce
College, Amravati

## -रा.से.यो.शिबीरातील दैनंदिनी-

| | |
|---|---|
| सकाळी ६.०० वा. - प्रार्थना व योगासने | दुपारी १२.३० ते १.०० - भोजन |
| सकाळी ७.३० वा. - चहा अल्पोपहार | दुपारी ३ ते ५.३० - बौद्धिक सत्र |
| सकाळी ८.०० ते १२ - श्रमदान/प्रकल्प कार्य | रात्री ७.३० - भोजन |
| दुपारी १२.३० - वैयक्तिक स्वच्छता | रात्री ८ ते १० सांस्कृतिक कार्यक्रम |

## -सदिच्छा भेटी-

मा. डॉ. **मुरलीधर चांदेकर** (कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)

मा. डॉ. **राजेश जयपुरकर** (प्र. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)

मा. डॉ. **अजय देशमुख** (कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)

मा. श्री. **श्रीकांत पाटील** (संचालक, प्रौढ व निरंतन शिक्षण विभाग, सं.गा.बा. अम.विद्यापीठ, अमरावती)

मा. श्री. **हर्षवर्धन देशमुख** (अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती)

मा. श्री. **दिलीपबाबू इंगोले** (कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती)

मा. प्राचार्य **केशवराव गावंडे** (अध्यक्ष, रा.से.यो. समिती तथा कार्यकारीणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती)

मा. प्रा. **राजाभाऊ उर्फ पी. के. देशमुख** (समिती सदस्य, रा.से.यो. समिती)

मा. प्राचार्य डॉ. **पृथ्वीसिंह राजपुत** (समिती सदस्य, रा.से.यो. समिती)

मा. श्री. **मधु घारड** (समिती सदस्य, रा.से.यो. समिती)

मा. डॉ. **स्मिता रावसाहेब देशमुख** (समिती सदस्य, रा.से.यो. समिती)

मा. श्री. **राजेश बुरंगे** (संचालक, रा.से.यो. अमरावती विद्यापीठ, अमरावती)

**तथा रा.से.यो.सल्लागार समिती तसेच विद्यापीठ व संस्थेचे सर्व सन्माननीय अधिकारी व पदाधिकारी गण**

प्रति,
श्री/श्रीमती ____________________

____________________

____________________

-: प्रेषक :-

**डॉ. स्मिता देशमुख**

प्राचार्य, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

**** **स्वच्छ भारत, सुंदर भारत** ****

Santa Graphics, Amt. 9923068655

# निमंत्रण पत्रिका





**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत**

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती व्दारा संचालित,

## श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर

**सोमवार, दि. १४/०१/२०१९ ते रविवार, दि. २०/०१/२०१९**

**स्थळ: जि.प. प्राथ. शाळा, पिंपळखुटा (अर्मळ), जि. अमरावती.**

मा.श्री.सौ. ____________________

आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर सोमवार दि. १४/०१/२०१९ ते रविवार, दि. २०/०१/२०१९ या कालावधीमध्ये दत्तकग्राम पिंपळखुटा (अर्मळ), जि. अमरावती येथे संपन्न होत आहे. या शिबिरामधील विविध कार्यक्रमास आपण सन्मानपूर्वक निमंत्रित आहात. कृपया आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**-आपले विनीत-**

प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख

प्रा. डॉ. वाय. सी. मेंढे (कार्यक्रम अधिकारी)
Mobile. 9881387715
प्रा. डॉ. डी. एस. नामूर्ते (सहकार्यक्रम अधिकारी)
सौ. अर्चना मनोहर डोईफोडे (सरपंच)
श्री. जीवक वाकडे (उपसरपंच)
श्री. वनवे साहेब (सचिव)
श्री. धर्मपाल सी. डोंगरे (सदस्य)
श्री. दिपक निमकार (सदस्य)
सौ. वनमाला तिडके (सदस्य)
सौ. हिरणताई अर्मळ (सदस्य)
सौ. वंदना लुटे (सदस्य)
रूपाली दंदे (सदस्य)
श्री. बालू बोंबले (सदस्य)

डॉ. सुवर्णा गाडगे (महिला कार्यक्रम अधिकारी)
डॉ. बी. टी. अंभोरे (रा.से.यो. सल्लागार समिती)
विजय राठोड, ऋषिकेश निमकर (विद्यार्थी प्रतिनिधी)
श्री. रमेश धांडे (अध्यक्ष, शाळा समिती)
श्री. प्रल्हाद परतेकी (मुख्याध्यापक)
श्री. अंजली अर्मळ (पोलीस पाटील)
विशेष सहाय्य :-
श्री. विलासराव डाहाके, श्री. राजेश आचलिया
श्री. भानुदासजी लुटे, डॉ. प्रमोद लोमटे
प्रा. श्री. तुळशिदासजी तिडके
श्री. मनोज अर्मळ, श्री. संतोष वाढोणकर
श्री. राजू चांदूरकर, श्री. आकाश डहाके
डॉ. चैतन्य कावलकर

महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी व गावातील प्रतिष्ठित नागरिक व समस्त गावकरी मंडळी

टिप - पिंपळखुटा (अर्मळ) हे गांव अमरावती विद्यापीठ रोडवर मार्डीच्या २ कि.मी. आधी आहे.

# ॥ दैनंदीन कार्यक्रम ॥

## सोमवार : १४/०१/२०१९

दुपारी २ वा. : दत्तक ग्राम येथे आगमन, परिसर स्वच्छता व नोंदणी
संध्या.५ वा. : ग्रामस्थांशी चर्चा, प्रकल्प निश्चिती व गटनिश्चिती

## मंगळवार : १५/०१/२०१९

सकाळी ६.०० : प्रार्थना व योगासने,
सकाळी ११.०० : **उद्घाटन समारंभ**

अध्यक्ष : मा. डॉ. स्मिता देशमुख (प्राचार्य, श्री शिवाजी कला व वाणिज्य महा., अम.) अधिष्ठाता, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
उद्घाटक : मा. प्राचार्य केशवराव गावंडे (अध्यक्ष, रा.से.यो.समिती तथा कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था,अम.)
प्रमुख उपस्थिती : मा. श्री. विजय लुंगे (युवकबिरादरी, अध्यक्ष विदर्भ)
मा. प्रा.डॉ.राजेश बुरंगे (संचालक, रा.से.यो. अमरावती विद्यापीठ, अमरावती)
प्रमुख अतिथी : मा. सौ. अर्चना डोईफोडे (सरपंच) मा. श्री. जीवक वाकडे (उपसरपंच)
मा. श्री. वनवे साहेब (सचिव) मा. श्री. धर्मपाल डोंगरे (सदस्य)
सन्मा. उपस्थिती : मा. डॉ. सुवर्णा गाडगे (क्षेत्रिय समन्वयक, रा.से.यो.)
प्रमुख उपस्थिती : मा. श्री. रमेश धांडे (अध्यक्ष, शाळा समिती)
मा. श्री. प्रल्हाद परतेकी (मुख्याध्यापक)
रात्री ८ वा. : सांस्कृतिक कार्यक्रम, सादरकर्ते : गावकरी भजनी मंडळी

## बुधवार : १६/०१/२०१९

सकाळी ६.०० : प्रार्थना व योगासने सकाळी ८ ते दु.१२ : श्रमदान/प्रकल्प कार्य
दुपारी ३ ते ५.३० : बौद्धिक सत्र, विषय: **व्यक्तिमत्व विकासात महापुरुषांचे योगदान**
प्रमुख वक्ते : मा. डॉ. रवींद्र शिरसाट, प्रा. आर. बी. वाघ (के.एल. महा. अम.)
उपस्थिती : मा. डॉ. बी. टी. अंभोरे, डॉ. जे. व्ही. गायकवाड, डॉ. हनुमंत लुंगे
डॉ. आनंद बनकर, प्रा. चेतन राऊत, प्रा. डॉ. मनोज जोशी
सायं. ६.०० वा. : **राष्ट्रभक्ती : आजचा युवा**
सादरकर्ते :- गौरव गोपाळ पांडे ('जनक' चिन्मय मिशन युवा वीर)

## गुरुवार : १७/०१/२०१९

सकाळी ६.०० : प्रार्थना व योगासने सकाळी ८ ते दु.१२: श्रमदान/प्रकल्प कार्य
सकाळी ९ ते दुपारी ४ : **विषय : आरोग्य शिबीर** (डी.एक्स.सी. टेक्नॉलॉजी प्रोजेक्ट स्वस्थ भारत पी.डी.एम.सी. अमरावती)
दुपारी ४ ते ५.३० : बौद्धिक सत्र, विषय : डिव्हाईन युथ,
सादरकर्ते :- निलिमा वानखडे (संपादक, हिंदुस्थान पत्रिका)
सिमाताई सरगिवे, प्रा. विश्वास जाधव

प्रमुख उपस्थिती : डॉ. एकनाथ जे. हेलगे, डॉ. किशोर फुले, प्रा. एम. व्ही. जगताप, डॉ. बबन झरे, प्रा. डॉ. नकुल देशमुख, प्रा. डॉ. प्रफुल्ल तायडे
साय. ६.३० : झनकार पंचरंगी सांस्कृतिक कार्यक्रम
सादरकर्ते : रियाझुद्दिन पटेल

## शुक्रवार : १८/०१/२०१९

सकाळी ६.०० : प्रार्थना व योगासने, सकाळी ८ ते दु.१२ : श्रमदान/प्रकल्प कार्य
दुपारी ३ ते ५.३० : बौद्धिक सत्र, विषय:-**महिला सक्षमिकरण काळाची गरज**
प्रमुख वक्ते : मा. डॉ. संगीता जगताप (कला वाणिज्य व विज्ञान महा. चिखलदरा)
उपस्थिती : डॉ. वर्षा चिखले, डॉ. अर्चना बोबडे, डॉ. सुजाता सबाने,
डॉ. वंदना देशमुख, डॉ. वैशाली देशमुख, डॉ. वैशाली टाकोडे
डॉ. अपर्णा टी. सरोदे
रात्री ८ वा. : समाज प्रबोधन
सादरकर्ते : मा. श्री. विद्याराज कोन्हे, दुर्गवाडा, ता. मोर्शी

## शनिवार : १९/०१/२०१९

सकाळी ६.०० : प्रार्थना व योगासने, सकाळी ८ ते दु.१२ : श्रमदान, वृक्षारोपण
दुपारी ३ वा. : बौद्धिक सत्र
विषय : **आकलन शक्ती वाढीसाठी व परीक्षा मार्गदर्शन**
प्रमुख वक्ते : मा. जीवन देशमुख,
मा. निलेश नागापुरे (एच.एम. ज्ञानदेव विद्यालय, पिंपळखुटा)
उपस्थिती : डॉ. महेंद्र मेटे, डॉ. किशोर साबळे, डॉ. नितीन चांगोले,
डॉ. कुमार बोबडे, डॉ. उमेश व्ही. कडू, डॉ. व्ही. एच. भटकर,
प्रा. जी. जी. भारती
सायं. ५ वा. : श्रम दिंडी : सादर कर्ते : प्रा. निलेश मोहोकार
सायं. ७ वा. : संगीत रजनी
सादरकर्ते : डॉ. प्रसाद मडावी, क्षेत्रिय समन्वयक, सं.गा.बा.अ.विद्यापीठ, अम.

## रविवार : २०/०१/२०१९

सकाळी ६ वा. : प्रार्थना व योगासने
सकाळी ८ ते १० : परिसर व ग्रामस्वच्छता
दुपारी १२ वा. : **समारोपीय कार्यक्रम**
अध्यक्ष : मा. डॉ. स्मिता देशमुख (प्राचार्य, श्री शिवाजी कला व वाणिज्य महा., अम.)
प्रमुख उपस्थिती : मा. प्रा. अंबादास मोहीते (वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, अमरावती) य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक
मा. प्रा. विशाल जाधव, (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी)
प्रमुख अतिथी : मा. अर्चना डोईफोडे (सरपंच), मा. श्री. जीवक वाकडे (उपसरपंच)
मा. श्री. वनवे साहेब, धर्मपाल डोंगरे (सदस्य),
प्रल्हाद परतेकी (मुख्याध्यापक)

Santa Graphics, Amt. 9923068655

# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे
# रा.से.यो. विशेष शिबीराचा अहवाल
# पिंपळखुटा (अर्मळ), जि. अमरावती
# दि. १४/०१/२०१९ ते २०/०१/२०१९

---

अमरावती:-

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर सोमवार दि. १४ ते २० जानेवारी २०१९ या कालावधीत दत्तकग्राम पिंपळखुटा (अर्मळ) येथे संपन्न झाले. या शिबीराला दि. १४ जानेवारी २०१९ रेजी आरंभ झाला. सोमवारी दत्तकग्राम पिंपळखुटा येथे आगमन झ ााले. त्यानंतर संपूर्ण परिसर स्वच्छ करून ग्रामस्थांशी चर्चा करून प्रकल्प निश्चित करण्यात आले. रात्री स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे गट निश्चित करण्यात आले. सायंकाळी प्रार्थना होऊन त्यांना कामाचे वाटप करण्यात आले. मंगळवार दि. १५ जानेवारी २०१९ ला सकाळी योगासने घेण्यात आली.

या विद्यार्थ्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे रोज प्राणायाम व योगासने शिकवून करून घेतले. त्यानंतर प्रार्थना व श्रमदान करून परिसर स्वच्छ झाल्यानंतर दुपारी ११ वा. उद्घाटन समारंभ घेण्यात आला. उद्घाटकीय समारंभाला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी अध्यक्षस्थान स्विकारून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्घाटक म्हणून लाभलेले मा. प्राचार्य केशवराव गावंडे (अध्यक्ष, रा.से.यो. समिती तथा कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांनी रा.से.यो. विषयी भूमिका कथन करून व्यक्तिमत्त्व घडविण्याचे हे व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन करून शिबीराचे उद्घाटन केले. डॉ. राजेश बुरंगे, प्र. संचालक रा.से.यो. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्री.

राजभाऊ पिदळी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छापर मार्गदर्शन केले. युवकबिरादरी, विदर्भ अध्यक्ष मा. श्री. विजय लुंगे यांनी विविध सामाजिक कार्यात युवकांचे योगदान लाभल्यास राष्ट्रविकास साधता येतो असे मत मांडले. या प्रसंगी गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ. अर्चना डोईफोडे, श्री. दिपक वाकडे, उपसरपंच, श्री. वनवे साहेब, सचिव, श्री. धर्मपाल डोंगरे, श्री. दिलीपराव निमकर, प्रा. निलेश नागापुरे, श्री. रमेश धांडे (अध्यक्ष, शाळा समिती), श्री. प्रल्हाद परतेकी, मुख्याध्यापक यांच्यासह डॉ. सुवर्णा गाडगे, क्षेत्रिय समन्वय सं.गा.बा.अमरावती विद्यापीठ, प्रा. वाय. सी. मेंढे, कार्यक्रम अधिकारी, डॉ. डी. एस. नामुर्ते सहकार्यक्रम अधिकारी व १०० स्वयंसेवक विद्यार्थी व गावकरी मंडळी यांच्या उपस्थितीत उद्घाटकीय कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. त्यानंतर रात्रीला विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

बुधवार दि. १६/०१/२०१९ रोजी सकाळी प्राणायाम, योगासने व प्रार्थना झाल्यानंतर प्रकल्प कार्याला सुरूवात करण्यात आली. बंधारा बांधण्यास प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी गावकरी मंडळीच्या सहभाग व विद्यार्थ्यांचे श्रम महत्त्वाचे ठरले. दुपारी भोजनोत्तर बौद्धिक सत्राला प्रारंभ झाला. व्यक्तिमत्व विकासात महापुरूषांचे योगदान या विषयावर डॉ. रविंद्र शिरसाट व प्रा. आर. बी. वाघ, के. एल. महा. अमरावती यांनी मार्गदर्शन केले. तसेच डॉ. मनोज जोशी यांनी आपले मत मांडले. सायंकाळी राष्ट्रभक्ती आजचा युवा याविषयी गौरव गोपाल पांडे, जनक चिन्मय मिशन युवा वीर यांनी सुंदरशा चित्रफिती दाखवून युवकांमधील राष्ट्रभक्ती व युवाशक्तीविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. बी. टी. अंभोरे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन संबोधित केले. विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम रात्रीला आयोजित करण्यात आले.

गुरूवार दि. १७/०१/२०१९ ला नियमित प्राणायाम, योगासने व प्रार्थना आटोपल्यानंतर प्रकल्प कार्य करण्यात आले आणि आरोग्य शिबिराकरिता डी.एक्स.सी. टेक्नॉलॉजी प्रोजेक्ट स्वस्थ भारत पी.डी.एम.सी. अमरावतीचे पथक आले. या आरोग्य तपासणी शिबिरात मोठ्या प्रमाणात गावकरी मंडळी सहभागी झाली. शिबिरार्थी विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी देखील यावेळी करण्यात आली. सकाळी १० पासून ते ५ वाजेपर्यंत हे आरोग्य शिबीर गावकऱ्यांसाठी मोफत सुरू होते. त्या दरम्यान डिव्हाईन युथ या विषयावरील बौद्धिक सत्राकरिता मा. निलिमा वानखडे सहसंपादक दैनिक हिंदूस्थान व सिमाताई सरगिवे, गायत्री परिवार, तसेच प्रा. विश्वास जाधव व गायत्री परिवारातील विद्यार्थ्यांनी योगासाचे प्रात्यक्षिक दाखविले. युवकांमधील विविध क्षमता ह्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कशा उपयुक्त ठरतात यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. बबन झरे, डॉ. प्रफुल्ल तायडे उपस्थित होते. सायंकाळी प्रार्थन झाल्यानंतर झनकार पंचरंगी सांस्कृतिक कार्यक्रम श्री रियाझुद्दिन पटेल यांचा प्रबोधनात्मक मनोरंजक कार्यक्रम झाला. गावकरी व विद्यार्थी यांच्या मनाचा ठाव घेणारा हा कार्यक्रम होता.

दि. १८ जानेवारी २०१९ शुक्रवारला सकाळी प्राणायाम व योगासने व प्रार्थना आटोपल्यानंतर बंधारा बांधण्याचा प्रकल्प कार्याकरिता सर्व विद्यार्थ्यांनी शारीरिक श्रम केले. दुपाच्या बौद्धिक सत्रात डॉ. संगीता जगताप यांनी महिला सक्षमीकरण काळाची गरज या विषयावर प्रमुख व्याख्यान दिले. त्याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ. वर्षा चिखले, डॉ. किशोर साबळे, डॉ. नितीने चांगोले, डॉ. जयराम गायकवाड, डॉ. जी. जी. भारती, डॉ. उमेश कडू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सायंकाळी मा. श्री. विद्याराज कोरे यांचे गाडगे महाराजांच्या वेशभूषेत समाजप्रबोधन कार्यक्रम झाला. त्यांनी गाडगेबाबांच्या विचारांचा प्रसार करून भजनातून लोकांची मने जिंकली.

दि. १९ जानेवारी २०९ शनिवारला सकाळी प्राणायाम, योगासने व प्रार्थना झाल्यानंतर बंधारा बांधण्याच्या कामी श्रमदान करण्यासाठी विद्यार्थी ग्रामस्वच्छता करीत निघाले. ग्रामदिंडी, श्रमदिंडीच्या माध्यमातून प्रा. निलेश मोहोकार व श्री. विद्याराज कोरे तसेच विद्यार्थ्यांनी पाणी अडवा पाणी जिरवा, स्वच्छ भारत स्वस्थ भारत, बळीराजा चेतना अभियान, शेतकरी आत्महत्या, बेटी बचाओ बेटी पढाओ इत्यादी विषयावर पथनाट्य सादर करून गावकरी मंडळीचे चित्तर वेधून घेतले. ग्रामजागृती केली. दुपारच्या बौद्धिक सत्रात मा. जीवन देशमुख यांनी आकलनशक्ती वाढीसाठीच्या जीवनशैली व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनातील नित्याच्या बाबीमधील बदल व एकाग्रता याविषयी उद्‌बोधन केले. या प्रसंगी डॉ. वैशाली देशमुख यांनी अध्यक्षीय भाषण केले व डॉ. अपर्णा सरोदे यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळी प्रार्थना नंतर डॉ. प्रसाद मडावी क्षेत्रिय समन्वयक सत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा यांच्या संगीत रजनी कार्यक्रमाने गावकरी मंडळींची मने जिंकली. डॉ. प्रसादर मडावी व त्यांच्या चमुने देशभक्तीपर गीतातून स्फूर्तीदायक वातावरण निर्माण केले.

२० जानेवारी २०१९ रविवारला दि. १४ जानेवारीपासून सुरू झालेल्या या शिबीराचा समारोपीय कार्यक्रम संपन्न झाला. सकाळची प्राणायाम, योगासने व प्रार्थना झाल्यानंतर प्रकल्प पूर्ण करण्यात आला. संपूर्ण परिसर स्वच्छ करून ग्रामजागर करण्यात आला. योजनेत्तर समारोपी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी शिबिराचा आढावा आपल्या अध्यक्षीय भाषणातून घेतला. या प्रसंगी प्रमुख उपस्थिती श्री. रामनाथ मांजुळकर, श्री. भूपेष गुन्हाने, कक्षाधिकारी यशवंतराव चव्हाण, मुक्त विद्यापीठ तसेच प्रा. अंबादास मोहिते तसेच प्रा. राहुल तट्टे, सरपंच सौ. अर्चना डोईफोडे, प्रल्हाद परतेकी, मुख्याध्यापक यांच्यासह उपसरपंच, सदस्य, सचिव व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व शिबिरातील विविध उपक्रमांची

माहिती डॉ. सुवर्णा गाडगे महिला कार्यक्रम अधिकारी यांनी दिली. तसेच स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच उत्कृष्ट गट म्हणून कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन हर्षल चव्हाण या स्वयंसेवकाने केले. विद्यार्थ्यांनी शिबिराविषयी आपले अनुभव व मनोगत पाहुण्यांसमोर मांडले. तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ. वाय. सी. मेंढे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली व पाहुण्यांच्या मार्गदर्शनानंतर डॉ. नामुर्ते, सहकार्यक्रम अधिकारी यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

सोमवार दि. १४ ते २० जानेवारी २०१९ पर्यंत राबविण्यात आलेल्या श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरात सकाळी योगासने व प्राणायाम आकाश खंडारे, बी.ए.भाग-२ या स्वयंसेवक विद्यार्थ्याने व प्रा. विश्वास जाधव यांनी घेतले. तसेच विद्यार्थ्यांना प्रार्थनेचे धडे डॉ. सुवर्णा गाडगे यांनी दिले. योगासने व प्रार्थना प्रकल्प कार्य, बंधारा बांधण्याच्या श्रमदानात डॉ. वाय. सी. मेंढे, डॉ. सुवर्णा गाडगे, डॉ. डी. एस. नामुर्ते यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक सर्व कार्यात सहभाग घेऊन या शिबीराला यशस्वी केले.

# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती
## राष्ट्रीय सेवा योजना
## विशेष शिबिर
## दि. १४ जानेवारी २०१९ ते २० जानेवारी २०१९
## विशेष प्रकल्प अहवाल

---

**एक दृष्टिक्षेप -**

**बंधारा प्रकल्प**

दि. १४/०१/२०१९ ते २०/०१/२०१९ या कालावधीमध्ये पिंपळखुटा अर्मळ येथे श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर संपन्न झाले. या शिबिरास्थळी दैनंदिन कार्याव्यतिरिक्त श्रमदान घेण्यात आले. या श्रमदानात रासेयो युनिटचे १०० स्वयंसेवक व गावातील काही लोकांच्या सहकार्यातून व श्रमदानातून बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. स्वयंसेवक व गावातील लोकांच्या श्रमदानातून ४० x ६० फुट बंधारा तयार करण्यात आला. पिंपळखुटा (अर्मळ) हे गाव शेतीप्रधान असून त्यासाठी पाण्याची गरज भासते. ही गरज लक्षात घेऊन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. वाय. सी. मेंढे सर यांनी गावातील सरपंच, उपसरपंच व प्रतिष्ठीत नागरिकांची बैठक घेऊन आपल्या गावातील पाण्याची समस्या कमी करायची असेल तर त्यासाठी बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. या बंधाऱ्यामुळे त्या गावातील पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात कमी होणार. गुरा-ढोऱ्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध होईल, तसेच पाणी थांबून राहिल्यामुळे पाण्याची पातळी (जलस्तर) उंचावेल. त्यामुळे हॅन्ड पम्प (हाप्सी) ला बाराही महिने पाणी राहिल्यामुळे गावकऱ्यांची पिण्याच्या पाण्याची सोय होईल. शेतीला पाणी देता येईल. अशा प्रकारे पाण्याचे महत्व व फायदा लक्षात घेऊन शिबिरार्थींनी श्रमदानातून हा उपयोगी बंधारा साकारला आहे.

# रासेयो म्हणजे विद्यार्थी घडवण्याचे व्यासपीट

## प्रा. केशवराव गावंडे यांचे प्रतिपादन

## शिवाजी कला-वाणिज्य महाविद्यालयाचे रासेयो शिबीर

8 Feb-2019 matrubhumi




फोटो : एनएसएस

प्रतिनिधी / ७ फेब्रुवारी

अमरावती : स्थानिक श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे श्रम संस्कार शिबिर दत्तक ग्राम पिंपळखुटा आर्मळ येथे पार पडले. महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील खेडे गावाचा विकास व्हावा व लोकांमध्ये विविध विषयांच्या बाबतीत जनजागृती व्हावी या उद्देशाने या श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सहा दिवसीय शिबिरामध्ये प्राणायम, प्रार्थना, श्रमदान, स्वच्छता अभियान आदि उपक्रम राबविण्यात आले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख या होत्या. शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य केशवराव गावंडे यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन झाले. यावेळी सरपंच अर्चना डोईफोडे, धर्मपाल डोंगरे, विलास डहाके उपास्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडविण्याचे एक व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन केशवराव गावंडे यांनी केले. गावातील विविध प्रश्नाचा आढावा घेऊन शिबिरार्थींनी गावकऱ्यांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले. त्यामध्ये आरोग्य शिबीर, पाण्याची कमतरता लक्षात घेता गावातील पाण्याची पातळी वाढावी यांसाठी बंधाऱ्यांची निर्मिती करण्यात आली. गावकऱ्यांमध्ये मतदान, अंधश्रद्धा, स्वछता, शिक्षण, राष्ट्रीय एकात्मता, शेतकरी आत्महत्या आदि विषयावर शिबिरार्थींनी जनजागृती करण्यात आली. लोकांनी विज्ञान तंत्रज्ञानासोबतच अध्यात्माकडेही वळावे या दृष्टिकोनातून ग्रामगीताचार्य निलेश मोहोकार यांच्या मार्गदर्शनाखाली पालखी मध्ये खराटा, पंजाबराव देशमुख व गाडगे बाबा यांच्या प्रतिमेसह ग्रामदिंडी काढण्यात आली. त्याला ग्रामस्थांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. शिबीरात युवक बिरादरीचे विदर्भ अध्यक्ष विजय लुंगे, अमरावती विद्यापीठाचे डॉ. राजेश बुरंगे, रविंद्र शिरसाठ, मनोज जोशी, गोपाल पांडे, डॉ. अभोरे, नीलिमा वानखडे, सीमा सरगिवे, विश्वास जाधव, संगीत जगताप, प्रा. कोरे आदिंनी भेटी देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाला महाविद्यालयच्या प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्ण गाडगे यांनी केले. उत्कृष्ट स्वयंसेवकाचा सत्कार करण्यात आला. शिबीराच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. वाय. सो. मेंढे, सहाययक कार्यक्रम अधिकारी डॉ. नामुर्ते, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा गाडगे, अजर खान, आकाश डहाके, सत्यम किरकटे, शुभम किरकटे यांनी परिश्रम घेतले.

दैनिक वृत्तपत्र : हिन्दुस्थान
दि. २१ जाने. २०१९

काच वेळी सर्व विस्थापित कुटुंबानी दरम्यान सुमाताचे अध्यक्ष मनोज साहेब, इत्यादी उपस्थित होते.

# सभ्य समाज निर्मितीची रासेयो स्वयंसेवकांनी घेतली शपथ






**अमरावती दि. २०:** समजदारी, इमानदारी, जबाबदारी व बहाद्दूरी या चतु:सुत्रीची जीवनात अंमलबजावणी करून एका स्वच्छ व सभ्य समाजाची निर्मिती करू. याकरीता स्वत: उत्कृष्ट होवू व इतरांना श्रेष्ठ बनवू. भारताला आदर्श राष्ट्र घडवू तसेच सर्वत्र विश्वबंधुत्वाची भावना रुजवू असा संकल्प डिव्हाईन यूथ कार्यशाळेच्या समारोपाप्रसंगी रासेयो स्वयंसेवक - सेविका यांनी पिंपळखुटा (अर्मळ) येथे केला. श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर दत्तक ग्राम पिंपळखुटा (अर्मळ) येथे नुकतेच संपन्न झाले. सदर शिबिरात गुरूवार दि. १७ जानेवारी रोजी बौध्दिक सत्राअंतर्गत डिव्हाईन यूथ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेच्या मुख्य मार्गदर्शिका सीमाताई सरगीवे यांनी उपस्थित रासेयो स्वयंसेवकांना प्रेरणा गीताच्या माध्यमातून माणुसकीच्या संवर्धनाकरीता आवाहन केले. युवावस्था ही राष्ट्राच्या विकासात मोलाची भूमिका पार पाडते म्हणून युवकांनी आपल्या सामाजिक कर्तव्याप्रती सदैव जागरुक असावे. स्वत:चे भवितव्य घडवितांना माता-पित्याचा सन्मान राखावा सोबतच राष्ट्र हीत जोपासावे असे ही त्या म्हणाल्या. याप्रसंगी देवसंस्कृती विश्वविद्यालय येथून आलेल्या विद्यार्थ्यांच्या चमूने रासेयो स्वयंसेवकांना प्रात्याक्षिकासह सुर्यनमस्कार व योग प्राणायामचे धडे दिले. देवसंस्कृती विश्वविद्यालयाचे मतीष राज यांनी तरुणाईला थोर महापुरूषांच्या चारित्र्याचा अभ्यास करून उज्वल भविष्याकरीता त्यांचे तत्वज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. भारतीय संस्कृतीची गौरव गाथा त्यांनी उपस्थितांसमोर मांडली. दुर्गेश प्रजापती यांनी राष्ट्र निर्माणात युवकांच्या भूमिकेचे विश्लेषण केले. तसेच देशभक्तीची भावना जागृत करणारी प्रेरक कविता सादर केली.

धीरज मीना यांनी योग-प्राणायामचे प्रात्याक्षिकासह प्रशिक्षण रासेयो स्वयंसेवकांना दिले. तसेच सशक्त युवा हेच सुदृढ राष्ट्र घडवितात असे मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात आरोग्य सुरक्षिततेच्या महत्वपूर्ण बाबी त्यांनी यावेळी सांगितल्या. कार्यशाळेच्या समारोपाला निलीमा वानखडे यांनी आदर्श राष्ट्र घडविण्याकरीता स्वच्छ मन च सभ्य समाज निर्मितीची शपथ रासेयो स्वयंसेवकांना दिली. यावेळी राष्ट्रीयत्वाच्या भावनेने प्रेरीत तरुणाईने उत्कृष्ट व्यक्तिमत्व घडविण्याचा संकल्प केला. संपूर्ण कार्यक्रमाला संगीतमयी साथ शंतनु सरगीवे यांनी दिली. यावेळी मंचावर राष्ट्रीय योग प्रचारक प्रा. विश्वास जाधव, दिनेश येते व डॉ. सुवर्णा गाडगे प्रामुख्याने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता अखिल विश्व गायत्री परिवार डिव्हाईन यूथ ची टिम, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. वाय.सी. मेंढे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा गाडगे तसेच रासेयो स्वयंसेवक व सेविकांनी अथक परिश्रम केले.

दैनिक वृत्तपत्र - जनमाध्यम
दि. २१ जाने. २०१९



*E-paper - www.janmadhyam.co*

21 जाने. 2019 जनमाध्यम

# श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराची यशस्वी सांगता




**अमरावती/ प्रतिनिधी**

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावतीच्या विशेष श्रम संस्कार शिबीर १४ ते २० जानेवारी या दरम्यान पिंपळखुटा अर्मळ येथे घेण्यात आले. ७ दिवस चाललेल्या या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबविले.

७ दिवस चाललेल्या श्रम संस्कार शिबिराचा दत्तक ग्राम पिंपळखुटा अर्मळ येथे थाटात समारोप झाला. प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली रविवार २० जानेवारी रोजी समारोपीय कार्यक्रम झाला. यावेळी रामनाथ मांजुळकर, भुपेष गुल्हाने, प्रा.अंबादास मोहीते, प्रा.राहुल तट्टे, सरपंच सौ.अर्चना डोईफोडे. प्रल्हाद परतेकी यांच्यासह गावातील गणमान्य नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.सुवर्णा गाडगे यांनी केले. याप्रसंगी स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थीनींचे उत्कृष्ट गट म्हणून कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ.वाय.सी.मेंढे यांनी शिबीरामागची भूमिका विशद करुन मुलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन हर्षल चव्हाण व आभार प्रदर्शन डॉ.नामुर्ते यांनी केले. सोमवार १४ जानेवारी ते रविवार २० जानेवारीपर्यंत राबविण्यात आलेल्या शिबिरामध्ये योगासन, प्राणायम, श्रमदान, परिसर स्वच्छता, आरोग्य शिबीर, बौध्दिक सत्र, व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

दैनिक वृत्तपत्र - जनमाध्यम
दि. २१ जाने. २०१९



२१ जाने. २०१९ जनमाध्यम

# श्री.शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराची यशस्वी सांगता




**अमरावती/ प्रतिनिधी**

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावतीच्या विशेष श्रम संस्कार शिबीर १४ ते २० जानेवारी या दरम्यान पिंपळखुटा अर्मळ येथे घेण्यात आले. ७ दिवस चाललेल्या या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबविले.

७ दिवस चाललेल्या श्रम संस्कार शिबिराचा दत्तक ग्राम पिंपळखुटा अर्मळ येथे थाटात समारोप झाला. प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली रविवार २० जानेवारी रोजी समारोपीय कार्यक्रम झाला. यावेळी रामनाथ मांजुळकर, भुपेष गुल्हाने, प्रा.अंबादास मोहीते, प्रा.राहुल तट्टे, सरपंच सौ.अर्चना डोईफोडे. प्रल्हाद परतेकी यांच्यासह गावातील गणमान्य नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.सुवर्णा गाडगे यांनी केले. याप्रसंगी स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थीनींचे उत्कृष्ट गट म्हणून कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ.वाय.सी.मेंढे यांनी शिबीरामागची भूमिका विशद करुन मुलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन हर्षल चव्हाण व आभार प्रदर्शन डॉ.नामुर्ते यांनी केले. सोमवार १४ जानेवारी ते रविवार २० जानेवारीपर्यंत राबविण्यात आलेल्या शिबिरामध्ये योगासन, प्राणायम, श्रमदान, परिसर स्वच्छता, आरोग्य शिबीर, बौध्दिक सत्र, व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

# रा. से. यो. विशेष शिबिरातील छायाचित्र




















## रा. से. यो. विशेष शिबिरातील छायाचित्र



















## रा. से. यो. विशेष शिबिरातील छायाचित्र


















# रा. से. यो. विशेष शिबिरातील छायाचित्रे





















# रा. से. यो. विशेष शिबिरातील छायाचित्र
















